प्रसिध्दीपत्रक दि. ०२/०३/२०२४

**विषय** :- **जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे तर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात आयोजित "लोक अदालतबाबत"**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे तर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात लोकहितासाठी व प्रलंबित खटल्यांची निर्गती करण्यासाठी प्रलंबित चलन केसेसचा निपटारा करणे करीता लोक अदालतीच्या अनुषंगाने दि. ०८/०२/२०२४ रोजी पासुन पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालय, येरवडा पुणे येथे मोटार वाहनांसंबधी खटल्याकरीता **"जिल्हा हेल्प डेस्क' ही सुविधा** सुरू करण्यात आली होती.

त्याअनुषंगाने लोकहितासाठी व प्रलंबित खटल्यांची निर्गती करण्यासाठी नागरिकांचे वाहनांवरील प्रलंबित असलेले वाहतूक नियमांचे भंग केलेल्या चलनाची निर्गती तडजोडअंती सूट देवून करण्यात येणार आहे. ज्या वाहनचालकांच्या वाहनांवर वाहतूक नियमभंग केलेबाबत केसेस प्रलंबित आहेत, अशा वाहनचालक / मालक यांनी दि. ०३/०३/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते १४.०० व १५.०० ते १७.०० या वेळेत पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालय, येरवडा पुणे येथे **"लोक अदालत'** चे आयोजन करण्यात आले आहे.

**( शशिकांत बोराटे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**सर्व संबधितांना.**